# प्रकरण - दुसरे

## नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथातील आशयसुत्रे

| | |
|---|---|
| २.१ | लहान मुलांचे भावविश्व |
| २.२ | मुलांचा जन्म म्हणजे मातेचा पुनर्जन्म |
| २.३ | व्यक्तींच्या विविध प्रवृतींचे दर्शन |
| २.४ | स्त्री - पुरूष संबधातील ताणतणाव |
| २.५ | आई वडील व मुले यांच्यातील ताणतणाव |
| २.६ | कौटुंबिक ओढ जिव्हाळा |
| २.७ | स्वप्न सृष्टीतील दृश्य |
| २.८ | प्रेमविषयक कथा |
| २.९ | वृत्तपत्र जगतातील अनितीमानता |
| २.१० | सरकारी खात्यातील भ्रष्टाचारी |
| २.११ | मानवी नाते संबधाचे चित्रण |
| २.१२ | सामाजिक जीवनातील अंधश्रद्धा |
| २.१३ | मानवी जीवनातील एकाकीपणा |

# '' नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथातील आशयसुत्रे''

प्रस्तुत प्रकरणामध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'काफिला' आणि 'संदर्भ' या कथासंग्रहाची आशयसुत्रे पहावयाचे ठरविले आहे. तसेच त्यानी मराठी वाड्.मयात घातलेली भर याचाही थोडक्यात विचार करावयाचा आहे.

नागनाथ कोत्तापल्ले हे मराठवाड्यातील लेखक आहेत. यांचा जन्म १९४८ मध्ये झाला १९७५ ला जेंव्हा ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली त्यावेळी समतावादी मुल्यांच्या प्रेरणेतून विराट आणि ग्रामीण समाजाची सुख-दु:खे व्यक्त झाली पाहिजेत या हेतुने तसेच शोषणमुक्त समाजनिर्मितीच्या ध्येयातुन आपणही सामील झाले पाहिजे यासाठी लेखनी हातात घेतली. ग्रामीण जीवनातील परंपरा रूढी, चालीरीती, विविध निष्ठा, वंशपरंपरागत वैर, निरागसपणा, रंगेलपणा, निवडणूका, राजकारण या गोष्टींचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यांच्या साहित्यात ग्रामीण आणि नागरी जीवन येते. त्यांनी कथासंग्रह, कादंबरी, समीक्षा, ललित गद्य, वैचारीक इत्यादी वाड्.मय प्रकारात लेखन केले आहे. त्यांची पहिली कथा 'छेद' ही प्रतिष्ठान मधून प्रसिद्ध झाली. सामान्यत: मध्यमवर्गीय व ग्रामीण समाजाची सुख - दु:खे त्यांच्या कथा कादंबऱ्यातून दिसून येतात.

अज्ञान, दारिद्रय आणि दु:ख यामुळे पांगळ्या बनलेल्या मानवी मनाचे खरेखुरे चित्रण त्यांनी 'कर्फ्यु आणि इतर कथा', 'काफिला', 'संदर्भ', 'रक्त आणि पाऊस', 'राजधानी', 'कवीची गोष्ट', 'देवाचे डोळे' या कथासंग्रहातून मांडले आहे. 'मुडस' हा कवितासंग्रह असून वैचारिकपर 'जोतिपर्व' मध्ये जोतिबा फुले, कृष्णराव भालेकर, ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री - पुरूष तुलना' तसेच अस्पृश्यांचा सच्चा सेवक कर्मवीर वि.रा.शिंदे यांच्या कार्यावर लेख लिहिले आहेत. तसेच ललित गद्य 'उद्याच्या सुंदर दिवसांसाठी असे त्यांचे विपूल साहित्य दिसून येते. याशिवाय अनेक समीक्षा लेख नियतकालीकातून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे काही लेख दैनिक लोकमताच्या अक्षररंग या पुरवणीमध्ये 'आजूबाजूला' या सदरामध्ये प्रसिद्ध झाले आहेत. यामधील काही लेख पुढीलप्रमाणे : 'कार्यकर्ता कसे व्हावे', 'मृत्यूच्या प्रदेशात', 'प्रिय बाई',

'वेताळाने सांगीलेली गोष्ट', 'साहित्याची ऐशीतैशी', 'बोरगांव महानगरीच्या कुशीत विसावतं तेंव्हा', 'भारत देश सुट्ट्यांचा देश', 'तीर्थक्षेत्राचे महातीर्थ' इत्यादी लेख दिसून येतात.

'उलट चालिला प्रवाहो' ही त्यांची पहिली कादंबरी याची द्वितीयावृत्ती काढताना 'मध्यरात्र' असे नामकरण केलेले दिसून येते. तसेच अतोनात कष्ट करून सुद्धा दारिद्रयाच्या कचाट्यात अनेक माणसे, कुटुंबे होरपळून निघत आहेत. कष्ट करून सुद्धा पोटभर अन्न मिळत नाही. पाहिलेल्या स्वप्नांना त्याना मुकावे लागते. अशा उपेक्षित जीवनाचे चित्रण या कांदबरीत केले आहे. तसेच 'गांधारीचे डोळे' या कांदबरीमध्ये राजकीय सत्तास्पर्धेचे जिवंत चित्रण केले आहे. निवडणूकीला उभे राहिलेले उमेद्वार स्वत:चे हितसंबंध राखून दुसऱ्याची कामे करून देतात. राजकारण त्यातील विविध धागे, गुंतागुंत, याबरोबरच कौटुंबिक जीवन, सत्ताधारी पक्षातील आमदार त्यांचे गट, डावपेच यांचे चित्रण त्यामध्ये दिसून येते. बदलत्या ग्रामीण जीवनाचे अर्थपूर्ण रूप त्यातून आकारास येते. निसर्ग, भाषा, वातावरण, पारंपारिक रूढी, समजुती रितीरिवाज, श्रद्धा याबरोबरच माणूस शोधणयाचा प्रयत्न नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला आहे. 'पापुद्रे' व त्रिज्या' यावर समीक्षा व 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' 'नवकथाकार : शंकर पाटील' इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. 'पाचोळा आणि दहा समीक्षक', 'स्त्री - पूरूष तुलना', 'निवडक बी. रघुनाथ', अपार्थिवाचे गाणे'(डॉ. द.ता. भोसले यांच्या सहकार्याने) तसेच 'गद्यगौरव', 'गद्यवैभव' (डॉ.वासुदेव मुलाटे यांच्या सहकार्याने) यांचे संपादन केले आहे.

नागनाथ कोत्तापल्ले यांचा 'काफिला' हा दूसरा कथासंग्रह १९८१ ला प्रसिद्ध झाला. यामध्ये १४ कथा आहेत तसेच 'संदर्भ' हा कथासंग्रह १९८३ ला प्रसिद्ध झाला. यामध्ये १३ कथा आहेत. या कथाना विविध नियतकालिकातून पूर्वप्रसिद्धी मिळालेली आहे. यांच्या कथात्मक साहित्यातील आशयसुत्रात विविधता दिसून येते. एकाच प्रकारचे एकसूत्री आशयसूत्रे आपल्या कथात्मक साहित्यात मांडत असलेले दिसून येत नाहीत. हेच आशयसुत्रातील वेगळेपण साहित्यामधून दिसून येते. अविवाहितांचे स्त्री - पुरूष संबंध, अविविहातांचे स्त्री- पुरूष संबंध, स्वप्न सृष्टीतील दृश्य, लहान मुलांचे भावविश्व,

वृत्तपत्रजगतातील अनितीमानता, पोलीस खात्यातील भ्रष्टाचारी तसेच व्यक्तींच्या विविध प्रवृत्तींचे दर्शन, मानसिक ताण तणाव याप्रकारची वगेवेगळी आशयसुत्रे त्यांच्या कथामधून आढळून येतात.

कोत्तापल्ले यांनी जे अनुभवलं ते आहे तसं कादंबरी, कथांच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागातील राजकारण, दलित व सवर्ण लोकांचा संसार कसा उद्ध्वस्त करते याचे चित्रण तसेच सामाजिक समस्यांना समर्थपणे वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी साहित्यामधून केलेला दिसून येतो. प्रभावी व्यक्तीरेखा, साधी सरळ भाषा, वाचकांची जिज्ञासा कायम ठेवण्याचे कौशल्य व घटनांचे आकर्षक वर्णन यामुळे त्यांच्या कथा उठावदार दिसून येतात. त्यांच्या 'काफिला' व 'संदर्भ' या कथासंग्रहातील आशयसुत्रे खालील प्रमाणे दिसून येतात.

## २.१) लहान मुलांचे भावविश्व:

लहान मुलांचे भावविश्व हे वेगळेच असते. त्यांचे विषय वेगळे , लहानसहान गोष्टीसाठीचा हट्ट, मोठ्या व्यक्तींचे नकळत अनुकरण करणे, त्यांच्याच वयोगटाच्या मुलांच्याबरोबर लुटूपुटूची भांडणे, स्वप्नरंजनात रममान होण्याची वृत्ती, मोठ्या व्यक्तीमध्ये बसून सारे काही जाणून घेण्याची त्यांची वृत्ती, धडपड, घरातून केंव्हा केंव्हा तू आता लहान राहिला नाहीस? असे एकून मी लहान आहे की मोठा? या संभ्रमात पडलेली मुले यांचे जग हे काही निराळेच असते. त्यांची प्रश्न विचारण्याची ढब काही वेळा ते प्रश्न विचारतात त्याची उत्तरेच आपल्याला देता येत नाहीत उदा. केळीमध्ये बी कोठे असते? इतरांच्याकडून गोष्टी एकून घेणे नंतर स्वत: तोडक्या मोडक्या शब्दात सांगणे असे वेगवेगळे प्रकार लहानमुलांच्यामधून दिसून येतात.

कोत्तापल्लेनी अशाच एका लहान मुलीच्या संदर्भातील कथा 'काफिला' या कथासंग्रहात मांडली आहे. आजीकडून गोष्टी ऐकायला मिळाव्यात किंवा स्वत:ची गोष्ट दुसऱ्यानी ऐकावी असे लहान मुलांना वाटते. त्यापैकीच यामधील एक 'पिंटीची गोष्ट', या पिंटीला गोष्टी ऐकून घेण्याची आवड आहे. ती आजीकडून माकडाच्या, कोल्ह्याच्या चिमणी, कावळे आणि राक्षस अशा अनेक गोष्टी ऐकून घेऊन त्याच गोष्टी सर्वासमोर

सांगणे असा तिचा छंदच आहे. महावीर जोंधळेच्या सर्व कविता तर अगदी ती ठेक्यात म्हणवून दाखवते. त्याचबरोबर ती ज्या गोष्टी सांगत असते त्या गोष्टीला कधी शेवटच नसतो. काहीतरी जोडून जोडून ती पुढे सांगत राहते. या पिंटीला जेंव्हा तिचे बाबा सांगतात की मास्तरांनी गणित घातलय ते सोडवतोय, त्यावेळी ती हसते कारण एवढ्या मोठ्या बाबानाही मास्तर आहेत याचे तिला आश्चर्य वाटते आणि ती म्हणते, '' बाबा तुमचे मास्तर कोठे असतात?''[१] असे प्रश्न विचारणारी पिंटी बाबांची नाराजी घालवण्यासाठी गोष्ट सांगते 'चिमणीची'. गोष्ट सांगताना तिच्या गोष्टीला मध्ये मध्ये हूँ हूँ चा प्रतिसाद तयायला हवा त्याचबरोबर मध्ये कोणीही बोललेलं तिला आवडत नाही त्यावेळी मध्ये कोणी बोललेच तर म्हणते, '' मध्येच पचाकक्न बोलू नको हॉ! सांगून ठेवते''[२] घरामध्ये जे काही बोलतात ते लहान मुले गोष्टीमध्ये घेऊन येतात त्याचप्रमाणे ही सुध्दा लाच म्हणजे काय हे माहित नसतानासुद्धा त्या गोष्टीचा वापर करताना दिसून येते.

पिंटीच्या गोष्टीत राक्षस, वाघ, कोल्हे येतात. तसेच चिमणीचे घर, खिडक्या, कॉट, लाईट, लालभडक पावसाचे पाणी अशा अनेक गोष्टी येतात. तिच्या गोष्टीत शेवटी चिमणीचे घर चिमणीने सांभाळायला सांगितलेला माणूस कुदळीने पूर्ण घर पाडतो. पण तो ते घर का पाडतो? हे तिला समजत नाही. शेवटी ती आपल्यालासुद्धा विचार करायला भाग पाडते. अशा या मुलांना कोणत्याही गोष्टीचा ताळमेळ नसतो तरीही त्यामध्ये डोक घालतात आणि नकळत शिकून जातात. अशा या मुलांचे विश्व कोत्तापल्लेनी सुंदररित्या प्रकट केले आहे.

## २.२) मुलाचा जन्म म्हणजे मातेचा पुनर्जन्म

मुलाला जन्म देणे म्हणजे मातेला करावं लागणारं एक दिव्यच म्हटलं तरी चालेल. प्रथम तिचे कितीही लाड होत असले तरी प्रसुती वेळचा प्रसंग त्यांना नकोसा होतो. 'कळा ज्या लागल्या जीवा' या कथेत प्रसुतीवेळच्या घटना त्याचबरोबर त्यापूर्वीच्या व नंतरचे प्रसंग यांचे चित्रण केले आहे. स्त्री ज्यावेळी मुलाला जन्म देते त्यावेळी तिचाही तो पुनर्जन्मच असतो तरीही ते तिला हवंहवसं वाटते. ती जेंव्हा गरोदर असते त्यावेळी ती एका वेगळ्याच विश्वात असते. तिला लागणारे सर्व डोहाळे अगदी आनंदाने पुरविले

जातात. नवऱ्याकडून लाड होतात तर सासर - माहेरकडून कौतुक होते. हळूहळू वाढणारे पोट आणि त्यावर सर्वांनी केलेली थट्टा आणि पोटातल्या पोटात फिरणारे मुल हे सर्व तिला हवेहवेसे वाटते. पण डिलेव्हरी होत नाही तोपर्यंत त्या गरोदर स्त्रिला हे आवडत असते पण डिलेव्हरीच्यावेळी होणाऱ्या त्रासात ती सर्वच विसरून जाते आणि याचेच चित्रण कोत्तापल्लेनी या कथेत मांडले आहे.

गरोदर स्त्रीच्या भावभावनांचे चित्रण तसेच डिलेव्हरीनंतरचे चित्रण या कथेत येते. यामधील नायिका सुधा ही गरोदर आहे तिचेसुध्दा गोडवे गाईले जातात दिलेल्या तारखेप्रमाणे दवाखान्यात घेऊन जातात. तिथे तिला अनेक स्त्रीया पहायला मिळतात. सुधाला जेंव्हा कळा वाढायला लागल्या त्यावेळी तिला वाटायचं की कुणीही कुणाचं नसतं. त्यावेळी आपलसं तिला कोणच वाटत नव्हतं. त्यावेळी आपल्यासमोर कोण आहे याच ही भान नव्हतं. परक्या पुरूषासमोर आपण आहोत याच एक क्षण तिला संकोचल्यासारखं होत पण त्यावेळी तिला काहीही वाटत नाही. अशा कित्येक स्त्रिया यायच्या कॉट रिकाम्या करायच्या परत त्या जागेवरती दुसरी यायची हे चक्र सुरू होते. या कथेतील सुधा अकरा दिवस दवाखान्यात होती त्या दिवसात तिला आलेला वेगवेगळे अनुभव यामध्ये प्रकट केले आहेत. सुधा दवाखाण्यात जाण्यापूर्वी एका बाईचा प्रसुतीच्या वेळी मृत्यू झाला त्यामुळे सर्व स्त्रिया घाबरत होत्या. सुधाची डिलेव्हरी तशी चांगलीच झाली होती. त्यानंतर येणाऱ्या बाया त्यांच्याशी झालेली भावनिक मैत्री तसेच त्या दिवसातील सुधाची स्वत:च्या घरी जाण्याची ओढ, पतीविषयी प्रेम, प्रेमापोटी पडलेलं स्वप्न आणि त्यामुळे तिची झालेली घालमेल यातून एका स्त्रिचे भावविश्व कोत्तापल्लेयांनी अत्यंत उत्कटपणे प्रकट केले आहे.

कोत्तापल्लेनी या कथेत स्त्रीची होणारी डिलेव्हरी म्हणजे एक पुर्नजन्मच याप्रमाणे अनेक स्त्रीयांना एकत्रीत करून त्यांचे दु:ख वेदना, त्यांच्या घरची परिस्थिती, एवढ्या यातना सहन करूनसुद्धा काही स्त्रीयांना घरचे लोक व्यवस्थित पहायला सुद्धा येत नाहीत तर कोवळ्या सोळा सतरा वर्षाच्या अल्लड मुलीने बाळाला जन्म दिल्यानंतरची तिची झालेली अवस्था, त्याचप्रमाणे आमदारीनबाई यानी सहा मुलाना जन्म देऊन अनुभव घेतलेल्या सातव्या मुलाविषयी त्याना काहीच वाटत नाही त्या सरळ प्रसुतीपूर्वी एक अख्खा

टरबुज कापून खातात याप्रकारचे वेगवेगळे नमुने त्यांच्या कथेत दिसून येतात.

## २.३) व्यक्तींच्या विविध प्रवृत्तींचे दर्शन :

कलीयुगात आता यंत्राचा वापर पदोपदी होत चाललेला आहे. माणूस माणसाला ओळखत नाही. वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे दीडवितीच्या पोटाला खायला काही मिळत नसल्याने किंवा इतर काही कारणाने गुन्हेगारी प्रवृत्ती ही वाढत चालली आहे.काही लोक नवनवीन यंत्रसामुग्रीमुळे आळसी बनत चालले आहेत त्यामुळे नवनवीन निर्माण होणाऱ्या कथामधून मानवी मनातील हिंसा, अहंकार, वासना, स्वार्थीवृत्ती यांचे चित्रण आले आहे. पण सर्वच लोक काही असे असत नाहीत. काही लोक असे असतात की मानवाप्रमाणेच प्राण्यावर, निसर्गावर इतर अन्य घटकावर प्रेम करतात याचे चित्रण अतिशय सुंदररीत्या कोत्तापल्लेनी मांडले आहे.

संवेदना बोथड झालेल्या मनाचं दर्शन त्यांच्या कथेतून दिसून येते 'तर हे असं' या कथेतील नायक याला यापूर्वी संवेदना नव्हती असे नाही मात्र कालांतराने जीवनातील सर्वच घटना प्रसंग निष्क्रियतेने पाहू लागतो. आपल्या प्रेयसीच्या लडीवाळपणाचा आणि बॉसच्या कठोरपणाचा त्याच्या मनावर काहीच परिणाम होत नाही. किंवा त्या बोलण्याच त्याला काहीच वाटत नाही एवढा तो भावनाशुन्य दिसून येतो. जवळचाच मित्र दिवंगत होतो तरीही त्याचे मन काही द्रवत नाही एवढा तो कठोर हृदयाचा बनला आहे मात्र मित्राच्या बायकोचे तारूण्य त्याच्या नजरेत भरते परंतू ते काही क्षणच पुन्हा पूर्वीचाच निर्विकार.

या नायकाचे प्रेयसीवरील असणारे प्रेम हे सुद्धा पुर्वीसारखे रहात नाही. ती भेटली म्हणजे त्याला स्वर्गात गेल्याचा भास होत असे. आता मात्र सर्वच बाबतीत कृत्रीमता जाणवते. प्रेयसीच्या लाडीवाळ प्रश्नांची मनात नसुनसुद्धा खोटी खोटी स्तुती करतो. त्याला तिच्याविषयी प्रेमच राहिले नाही ती मात्र प्रथम भेटलेल्या तारखेच्या दिवशीच लग्न करू इच्छिते. तो टाळण्याचा प्रयत्न करतो शेवटी तो बाप बनणार असुनसुद्धा प्रेयसीच्या भावनांची कदर त्याला वाटत नाही. ती मात्र होणाऱ्या बाळाची स्वप्न पाहत असते अशा वेगवेगळया प्रकारची माणसे यांचे चित्रण कोत्तापल्लेनी केले आहे.

'मया' या कथेत बदलत्या मानवी मनाचे चित्रण दिसून येते घरातील वाढणाऱ्या मुलांचे लेंडार पाहून आणि त्यातच पत्नी आठव्यांदा गरोदर त्यामुळे कथेतील हा नायक हरबा वैतागतो, चिंताग्रस्त बनतो. डालग्या अनेक बनविल्या जातात पण विक्री होत नाही. आपल्याप्रमाणे मुले शिक्षणाविना वंचीत राहू नये असे त्याला वाटते. कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर असल्यामुळे पत्नीच्या बाळंतपणासाठी डुकरे विकायला काढणे आवश्यक असते. अशावेळी डुकराला चांगली किंमत येणार नाही याची त्याला जाणीव असते पण पैशासाठी तो विकायला काढतो. एकदिवस पंढरी स्वत: होऊन डुकरे विकत घ्यायला येतो हरबा तसेच घरातील सर्वांना आनंद होतो. पण पंढरी हा पाहुण्यांना खूश करण्यासाठी डुकराला विकत घ्यायला आला आहे हे कारण समजताच तो विकत नाही म्हणून सांगतो. दररोज डोळ्यासमोर नाचत असणारी डुकरे, त्यांचा होणारा आक्रोश, कत्तल, त्याला मारावयासाठी टांगणे ही कल्पनाच त्याला सहन होत नाही अशा व्यक्ती समाजात अनेक दिसुन येतात की जी माणसापेक्षा प्राण्यांवर अधिक प्रेम करतात.

आपल्याला समाजात वावरत असताना अशा काही व्यक्ती भेटतात की ते स्वत:चा आत्मविश्वास केवढा आहे हे पाहण्यासाठी त्याचा दुसऱ्यावर प्रयोग करताना दिसतात याप्रमाणे 'हकीकत : वास्तवातली' या कथेमध्ये एक म्हातारा असाच रस्त्यावरून जाणाऱ्या काही मुलांना असेच काहीतरी सांगुन त्यांना स्व:ताकडे आकर्षित करून घेतो राघव असाच कामावरून जात असताना तो म्हातारा त्याला बोलावुन त्याला प्रथम स्वत:च्या शब्दात पकडतो. त्याला स्वत:च्या वेड्या मुलीसाठी तुझ्यासारखा सुंदर मुलगा हवा अस काहीतरी सांगून त्याला घरी येण्यास प्रवृत्त करून शेवटी धमकी देतो की, " पळून जाण्याचा प्रयत्न केलास तरी मी गाठीनच" [१] त्यामुळे राघव घाबरतो पण डिसुझा जेंव्हा ह्या म्हाताऱ्याविषयी सर्व खुलासेवार सांगतो त्यावेळी सर्वच हसायला लागतात. अशी वेगवेगळ्या प्रकारची माणसे समाजात दिसून येतात त्यांचे वर्णन नागनाथ कोत्तापल्लेयांनी कथेद्वारे करून दाखविले आहे.

छोट्या छोट्या गोष्टीवरूनसुद्धा काहीना आत्महत्या करावीसी वाटते पण आत्महत्या करावयाचे म्हटले तर तेवढे धैर्य, आत्मविश्वास, धाडस असावे लागते. कोणीही शक्यतो आत्महत्या करायची जिद्द मनापासून ठेवली तर तो त्या कार्यात नक्कीच

उतरू शकेल. 'फसवणूक' याकथेमध्ये कथानायक याला सतत आत्महत्या करावीशी वाटते. त्याने यासाठी प्रयत्न केले पण सफल झाले नाहीत. मरू इच्छिणाऱ्या या कथानायकाला मरणाची पण भिती वाटते. काही वेळेला याला वाटते की आपल्याला कोणीतरी मारायलाच येत आहेत एकदा सामंतबाईचा भाऊ पिशवी हवी होती यासाठी आलेला, पण त्याला वाटते की आता तो आपले नरडे दाबणार. इकडे जगण्याविषयी आसक्ती तर इकडे मरण्याविषयी, तर याचप्रमाणे वेगळ्या प्रवृत्तीचा ऑफिसमधला त्यांचा साहेब. स्वत:ची मुलगी कमल ही आंधळी आहे. तिचा आणि त्याचा परिचय वाढून प्रेमात रूपांतर व्हावे यासाठी साहेब याला वारंवार पाठवतात. त्यातच आजाराने कथानायकाचे वडील मरतात पण त्याला कमलची ओढ जास्त प्रमाणात असते, त्यात त्यांचा शारीरिक संबंध येतो . प्रेम आंधळे असतं अस म्हटल जात त्याप्रमाणे त्याला कमल आंधळी होती हे पूर्वी जाणवलं नाही पण जेंव्हा तिच्याशी समागम होते, तेंव्हा त्याला पश्चाताप होतो की, 'एका आंधळी बरोबर आपण काय केलं? ' [४] पण हे जेंव्हा त्याच्या साहेबाला समजतं तेंव्हा साहेब त्याला पुन्हा घरी पाठवतात त्यावेळी तो नकार देतो तेंव्हा नोकरी तून काढून टाकण्यासंबंधी धमकी देतात. त्याचबरोबर म्हणतात, 'काढल्यानंतर काय खाशील? काय करशील तू?' त्यावेळी अगदी आत्मविश्वासाने तो म्हणतो, मी आत्महत्या करीन अशी वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसे नागनाथ कोत्तापल्लेनी चित्रित केली आहेत.

## २.४) स्त्री - पुरूष संबधातील ताणतणाव :

प्रेम, विश्वास आणि समजुतदारपणा ही तीन सुत्रं जर पती - पत्नींच्या संसारात असतील तरच संसार सुरळीत होऊ शकेल. नाहीतर संसारात सतत भांडणे होत असलेली दिसून येतात. मुख्य म्हणजे पती - पत्नी हे कौटुंबिक जीवनातील महत्वाचे घटक त्यामुळे त्यानां एका रथाची दोन चाके समजले जाते. काही म्हणतात की ही रथाची दोन चाके नसून सायकलीची दोन चाके कारण सायकलीचे पहिले चाक याकडे महत्वाचे कार्य असते पण ओझे मात्र सायकलीच्या मागच्या चाकावर असते, हेच मागचे चाक म्हणजे स्त्री. जेंव्हा आपण असे समजू तेंव्हाच वैवाहीक जीवनात ताणतणाव नाहिसे होतात शेवटी दोघांनीही एकमेकाला तितकच समजून घ्यायला हवे. कारण दोघेही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे जेंव्हा समजुन घेतील तेंव्हाच संसार सुरळीत होतील नाहीतर काय

होऊ शकत यासंदर्भात काही कथातून कोत्तापल्लेनी त्याविषयी चित्रण केले आहे.

'विदूषक' या कथेध्ये कौडिण्याधिपतीच्या हेमंतकुमार महाराजांना एक दिवस राजधानीचा कंटाळा येतो. हा कंटाळा घालविण्यासाठी तो राज्याबाहेर जाण्याचे ठरवितो व आपल्याबरोबर विदूषक व खानसाम्या यांना घेऊन उदयपुरला जातो त्यावेळी महाराज दररोज हसवणाऱ्या विदूषकाला दु:खाचा प्रत्यय येणारी गोष्ट सांगायला सांगतो त्यावेळी विदूषकाने सांगीतलेल्या गोष्टीपैकी पहिल्या व दुसऱ्या गोष्टीत पती-पत्नींचे भांडण व त्यांच्यातुन झालेला शेवट दाखविला आहे. प्रतिभाशक्ती ही सर्वांनाच मिळते असे नाही पण या गोष्टीतील कवी हा प्रतिभावंत आहे. कविता खूप लिहतो पण त्या कवितेने त्याच्या कुटुंबाचे पोट भरत नाही त्यामुळे सतत कवी आणि त्याच्या पत्नीमध्ये भांडण होत असते पण एक दिवस असा उजडतो की स्वत: शेटजी कवीच्या घरी स्वत:च चरित्र लिहून घेण्यासाठी पैशाची थैली घेऊन येतो ती पैशाची थैली पत्नी लगेचच घरात घेऊन जाते त्यामुळे कवीच्या मनात नसुनसुध्दा शेटजीचे चरित्र लिहायला घ्यावे लागते. कवीला स्वत:च्या पूर्वीच्या कविता आठवतात काणि आता पैशासाठी लिहिलेल्या कविता यामुळे त्यांचा अहंम दुखावला जातो. त्यावेळी तो आपल्या पत्नीला म्हणतो, '' जास्त बोलू नकोस, माझ्या अध:पतनाला तूच कारण आहेस''[५] त्यावेळी ती म्हणते, 'कोणीच कोणाच्या अध:पतनाला जबाबदार असत नाही प्रत्येकजण आपापल्या अध:पतनाला आपणच जबाबदार असतो. हे सोयिस्करपणे विसरतो एवढेच'' आणि अशातच पत्नीने आपल्याला समजुन न घेतल्याने त्याच काळजीने त्याचा मृत्यू होतो. तर त्यातच 'दुसरी गोष्ट' यामध्ये 'एकच प्याला' प्रमाणे एक दिवस भांडण झाल्यानंतर त्यांच्या दररोजच्या भांडणाला ऊत येतो.

एक दिवस नवऱ्याचे मित्र देवीच्या महापुजे निमित्त बोलावले जाते. त्याना गोडधोड करण्यासाठी तेलाची कढई चुलाण्यावर ती ठेवते. तिला भांडणात दररोज आत्महत्या करावीसी वाटते पण त्या पुजेच्या दिवशी कढईतील उकळलेले तेल अंगावर ओतून घेऊन मरते. असे नकळतच पती - पत्नीच्या भांडणात होऊन जाते. पण या दोघांच्या भांडणात मुलांचे काय? असे झाल्यानंतर मुलांना आईचे प्रेम कोठून मिळायचे? की मुलांच्यासाठी तिने नवऱ्याकडून होणारा छळ सहन करायचा? असे अनेक प्रश्न

कथेद्वारे कोत्तापल्लेनी वाचकांसमोर मांडले आहेत.

'राखण' या कथेतील धोंडिबा पणघट हा आईच्या प्रेमात वाढलेला आहे. बाहेरचे ज्ञान त्याला नाही त्यातच वीस - बावीसाव्या वर्षी लग्न होते. कोणताच अनुभव नसल्याने आणि त्यातच नाजूक आणि सुंदर वस्तुला खूप सांभाळावं लागतं असे त्याची आई, मित्र सांगतात. त्याला इतर कोणताच अनुभव नसल्यामुळे 'सांभाळणं' या शब्दातच तो गुंततो आणि सतत पत्नीच्या माग राहतो मग ती शेताला जावो, पाणी आणायला जावो किंवा कपडे धुवायला जावो हा तिच्या मागंच असतो जणू तिची सर्वच जबाबदारी त्याच्यावरच आहे. त्यामुळे तो मित्रांना तसेच तिच्या माहेरच्या लोकांना सर्वांनाच घरी यायचे बंद करतो.

जेंव्हा एखादी व्यक्ती असे वागू लागते त्यावेळीच आपल्यावर नको तेवढी बंधने आहेत हे सहन होत नाही आणि नकळत मग मन बाहेर लागून राहतं आणि हेच या कथेमध्ये दिसून येत. शेवटी आपल्या पतीचा आपल्यावरती विश्वास नसल्याने सुंदरा धोंडीबाला फसवून त्याला सोडून पळून जाते.

एकमेकांना समजावून न घेतल्यामुळे पती - पत्नी या अत्यंत जवळकीच्या नात्यातही कोरडेपणा, तटस्थपणा दिसून येतो. बऱ्याच कुटुंबात मानसिक संघर्षामुळे दोघांच्यात ताणतणाव निर्माण होतात. वरवरच्या प्रेमामुळे संसारात सुख मिळत नाही दोघानीही एकमेकानां समजून घेतलं पाहिजे त्याप्रमाणेच 'घर' या कथेमध्ये सदानंद आणि त्याची पत्नी यांच्यामध्ये सतत संघर्ष दिसून येतो. आणि हे त्यांनी चिमणा - चिमणीच्या संदर्भात दाखविले आहे. एक काडी दोन चोचीत धरणारे हे जीव नंतर कसे दुरावत गेले तसे सदानंदच्या पत्नीला येणारा सतत फोन यामुळे त्यांच्यात आलेले वितुष्ट यामध्ये दिसून येते. चिमणा नेहमी येऊन आरशात आपले प्रतिबिंब पाहतो तसा सदानंदही स्वत:ला कोसतो, आपल्याला नष्ट करण्याचे पाहतो. त्याप्रमाणे चिमणी ही सुद्धा प्रत्येकवेळी फॅनवर बसते तसे त्याच्या पत्नीलाही बाहेरून फोन येत राहतात त्यामुळे सदानंद चिडचिडा स्वभावाचा बनला आहे. त्यामुळे तो सतत आजाऱ्यासारखा कॉटवर पडून राहतो. त्यात तो चिमणा - चिमणी यांच्याकडे तीक्ष्ण नजरेने पाहत असतो. त्यांचे येणे, जाणे, बसणे

त्यांच्यातील संघर्ष याकडे तो बारकाईने पहात असतो. त्यांच्यातील झालेल्या शेवटच्या झुंजीत चिमणी घायाळ होऊन पडते हे सदानंदच्या पत्नीला पहावत नाही आणि कारूण्याने ओथंबुन ती पाण्याच भांड घेऊन ती चिमणीच्या चोचीजवळ ठेवते. पण सतत शांत असणारा सदानंद याला ते पहावत नाही तो त्यावेळी पाणी ठेवायला देत नाही. पत्नीचा येणारा फोन, सतत खणखणणारा तो आवाज यामुळे तो चिडतो आणि स्वत:तीचा फोन घेऊन बसतो.

## २.५) आई - वडील व मुले यांच्यातील ताणतणाव :

कुटुंबात आई - वडील, मुले, नातवंडे अशी वेगवेगळी नातीगोती असतात. मुलांचे संगोपन लहानपणापासून आई वडीलच करतात.त्यामुळे त्यांच्यावर अनेक वेगवेगळे संस्कार करतात, शिकवतात आणि जसजसे मोठ-मोठी होत जातील तसे त्याच्यावर अनेक इच्छा - आकांक्षा यांचा भडीमार करतात. त्यांची आवड निवड कशात आहे याकडे फारसे लक्ष दिले जात नाही त्यामुळे त्यांच्यातील संघर्ष निर्माण होत जातो. मुले कर्तबगार झाली की त्यांच्यावर अनेक कामे जवळ येतात. त्यामुळे कौटुंबिक सर्व रीती - रिवाज त्याना पाळावे लागतात त्यामुळे नकळत भांडणे निर्माण होतात, कोणत्याही आई-वडिलांना मुलांनी शिकून मोठे व्हावे त्याने नोकरी करावी, घर चालवावे अशी अनेक स्वप्ने पाहिलेली असतात पण ज्यावेळी शाळा शिकूनसुद्धा मुलगा कमवत नसला तर त्या मुलाविषयीच तिटकारा निर्माण होतो.

'विनोद' यामध्ये कोत्तापल्लेनी गोल्ड मेडल मिळविलला एका सुशिक्षित तरूण मोहन याची कथा लिहिली आहे. मोहन हा एम.ए झालेला, पण नोकरीपासून वंचित असलेला. हा वृत्तपत्रीय बातम्या देतो पण तेवढ्याने घर चालविणे शक्य नसते. मोहनची आई मोहनवर खूप प्रेम करायची त्याच्या केसातून बोटे फिरविणे, आपल्या कानाजवळ बोटे मोडून त्याच्या विषयीचे प्रेम व्यक्त करणे, त्याचे सतत कौतुक करणे असे करायची पण तिला वाटते की मोहनच नोकरी करत नाही त्यामुळे मोहनरावांसारख्या व्यक्तीसमोर त्याचा पाणउतारा करते ती मोहनला म्हणते, ''मोहन बाळ ज्वारी आणावी लागेल रे, कालच संपली बघ'' [७] अशाप्रकारे अनेक येणाऱ्या वैफल्यांना नोकरी नसल्याने तोंड द्यावे लागते.

फुकटचं हसू ओठावर आणून आपला चरितार्थ चालवणारी प्रतिष्ठितांच्या कॉलनीत राहुनसुद्धा वेगळा मार्ग स्वीकारणारी त्यामुळे रंगाची झालेली मानसिक स्थिती 'दात' या कथेत सांगितली आहे. दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे याप्रमाणे ही रंगाची आई. समाजामध्ये मुलगा हाच वंशाचा दिवा समजला जातो पण वेश्या व्यवसायामध्ये मुलगीला उच्च दर्जा दिला जातो. कारण म्हातारपणी काठीचा आधार तीच त्याना असते. अशीच ही रंगाची आई हिलापण वाटते आपल्याला एक मुलगी असती तर सुखाने राहिलो असतो. त्यासाठी रंगाला म्हणते, 'तूआता लग्न तरी कर रे बाळ, म्हणजे सुखाने तरी राहु''[८] सगळीकड अंधार काळोखी पडलेली आहे.त्याचे घर म्हणजे घर म्हणण्यासारखे नाही त्याच्यातच रंगा कमवताही नाही. त्यातच आजारी असणारी आई. तिचा औषध खर्च सुद्धा रंगाला भागवता येत नाही. घरखर्च चालविण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक आहे. यासाठी त्याची आई आजारी असूनसुद्धा शेवटी रात्रीच्यावेळी चोरटच्यान येणाऱ्या पुरूषाला खोट खोट हास्य करणारी आई रंगाला दिसते. त्यावेळीच टिटवी घरावरून ओरडत जाते म्हणजे कुणीतरी मरणार असे समजले जाते त्यावेळी त्याला वाटते की आपल्या घरावरून टिटवी ओरडत गेली तर आपल्याला बरे होईल असे त्याला वाटते अशी जीवनाला कंटाळलेली माणसे दिसून येतात.

## २.६) कौटुंबिक ओढ / जिव्हाळा :

प्रत्येकाला शेवटी कौटुंबिक प्रेम हे असतेच मग घरात त्याला कितीही त्रास देवो किंवा घरातून त्याला बाहेर घालवले तरी तो आपल्या कुटुंबावरती प्रेम करतोच.मरणाच्या दाढेत जरी असले तरी शेवटी ओढ असते आपल्या मुलांची घरातल्या प्रत्येकाची, सुख दु:खाच्यावेळी धावून येणाऱ्या आपल्या नोतेवाईकांची , मित्रमंडळींची, तसेच कामानिमित्त बाहेर असणाऱ्या व्यक्तीलासुद्धा आपल्या कुटुंबातील लोकांना पहायची उत्सुकता असते. आणि या संदर्भातसुद्धा कोत्तापल्लेनी थोडक्यात 'इत्यंभूत' कथेत मांडले आहे.

'इत्यंभूत' या कथेत शिरसाळकर समजून आणलेल्या पाटलाला इन्स्पेक्टर नको तेवढा त्रास देतात. हा पाटील मुलीला आणि आपल्या पत्नीला मोठ्या उत्सुकतेने

पहायला येत असतो पण नकळत त्याला खोट्या आरोपाखाली चुकीने त्याला पकडले जाते. पण त्याला त्या हालाखीतून परत घरी जाऊ की नाही याची शक्यता नव्हती. त्याचे तुरूंगात नकोतेवढे हाल होत होते तरीही तो स्वत:पेक्षा मुलीची आणि पत्नीची काळजी करतो. त्याला वाटते की, आपल्यामागे पत्नीचे काय होईल? मुलीचे काय होईल? त्यावेळी तो म्हणतो, ''राधिका मी आलोच नाही तर काय कराल गं? वाट पहाल? किती दिवस? वर्ष, दोन वर्ष?... मग कुंकू पुसून तू दु:ख विसरशील...''[१] अशी काळजी त्याला वाटते. कोणत्याही व्यक्तीला कितीही दु:खे असली तरी शेवटी कौटुंबिक ओढ ही असतेच.

## २.७) स्वप्न सृष्टीतील दृश्य :

स्वप्ने पाहणे आणि ती साकार करणे ही मानवजात नैर्गिक प्रवृत्ती आहे. कोण भविष्यविषयक स्वप्न पाहतं, कोण दिवास्वप्न पाहत, तर काहींना झोपेत स्वप्न पडतात. काही मनोरंजक, तर काही दु:खदायक. दिवसभरात आपण ज्याचे स्मरण करतो तेच वेगवेगळ्या पद्धतीने स्वप्नात येत असते. जे आपण प्रत्यक्षात करत नाही ते स्वप्नात करू शकतो. स्वप्नात जेव्हा एखादी व्यक्ती मग्न असते त्यावेळी त्याला कसलेच भान रहात नाही. आपण जे पाहतोय ते खरोखरच घडत आहे असे वाटते. जेंव्हा स्वप्नातून जागे होतो तेंव्हा पूर्ववत जसे होते तसेच असते.

'बाहुल्यासारखा' या कथेत कटपुतलीबाहुलीचा खेळ करवून दाखविताना सर्व सुत्रे जशी त्या बाहुल्या खेळवणाऱ्या व्यक्तीकडेच असतात. त्याचप्रमाणे या कथेवरून दिसून येते, की यामधील नायक हा स्वप्न पाहत आहे खरोखरच त्याच्या प्रेयसीची वाट पाहत आहे, हेच प्रथम समजून येत नाही. कारण शेवटपर्यंत कथानायक हा प्रेमप्रकरण स्वत:च मांडत गेला आहे. तिचे विचार स्वत:च निवेदन केले आहेत. प्रत्यक्षात ती प्रेयसी त्याच्याजवळ नाहीच .तो मात्र तिला बागेत घेऊन जाण्याचे, तिचे चुंबन घेण्याचे भविष्य वर्तवितो आणि तो त्या गोष्टीत इतका गढून जातो की त्याला वाटते, ती प्रत्यक्षात त्याच्याजवळ आली आहे आणि तो आपण तिला मनात जुळवून ठेवलेले प्रश्न विचारतो आणि तिने त्यावर काहीच प्रतिसाद दिला नाहीतर त्याला चुकल्या - चुकल्यासारखे

वाटून जाते.

ती प्रेयसी येणे, बागेत घेऊन जाणे, काहीतरी प्रश्न विचारणे, हॉटेलमध्ये घेऊन जाणे, ती परत जाण्यापूर्वीचा तिचा पडलेला चेहरा, त्यामुळे त्याचं मन अस्वस्थ होणंअन् त्यातच तीच कुशीत शिरणं आणि ती नकळत वेगानं जाणं हे सर्व अगदी कटपुतली बाहुली आणि सुत्रधार म्हणजेच तो आणि त्याचे मन यातच गुरफटून इतका गेला आहे की तो शेवटी स्वत:चच अस्तित्व शोधत राहतो.

'दसरा उजाडला' या कथेत मोरूचा बाप दसरा का साजरा केला जातो, त्यामागे पारंपरिक कोणती प्रथा आहे हे मोरूला समजवत असतो पांडवानी शमीच्या वृक्षावर आपली शस्त्रे आणि वस्त्रे कशी ठेवली त्याचा इतिहास सांगतो आणि तो त्याच्यातच गढून जातो. मोरूच्या बापाला वाटते, जर आपण पुर्वज असतो तर पांडवाच्या बाजूने लढलो असतो. युद्धावर जाताना पत्नी ओवाळायला आली असती 'विजय मिळवून या' असे शुभ बोलली असती. आपण पूर्ण युद्धात तल्लीन झालेले असू आणि घराकडून त्याचवेळी मोरू जन्मल्याची बातमी आली असती. मग युद्ध चालू असताना भावनिकतेने मोरू बाळाला सांगितलं असतं की, आईला त्रास देऊ नको, रडू नको. असे सांगणारा मोरूचा बाप पुढे पाहतो की आपण अर्जुनाला युद्धाविषयी समजावून सांगतो आहे त्याला घाबरू नको, मी दानशुर आहे. मी पुढे जातो आपण चीनच्या युद्धाच्यावेळी काय काय केलो हे सर्व काही अर्जुनाला सांगत आहोत असा भास निर्माण करतो आणि तिकडे कौरव सेनेवर आपण तुटून पडतो आहोत असे त्याला वाटते. अशी स्वप्ने पाहणारे नमुने कोत्तापल्लेनी कथेद्वारे प्रकट केले आहेत.

'छेद' या कथेतील कथानायक मात्र झोपलेला आहे. त्याचे पूर्वी ख्रिश्चन धर्मोपदेशिका हिच्यावर प्रेम आहे. तिचे दु:ख समजावून घ्यायचे त्याच्या मनात होते पण ती रडायला लागली. त्यामुळे तिला तो थांबवतो पण ती रूखरूख त्याच्या मनात सतत सलते. त्याच घटनेने तो उदास असा आहे. आणि त्याच्यातच त्याला स्वप्न पडते की ती ख्रिश्चन धर्मोपदेशिका त्याच्या बाहूत आहे. मात्र त्याच्या बरगड्यांना मात्र तिचा क्रॉसबोचत आहे आणि ती मात्र त्याला आपल्याच पंखात गुदमरून घेत आहे अशी

वेगवेगळया प्रकाराची स्वप्ने पहायला मिळतात.

## २.८) प्रेमविषयक कथा :

प्रेम कोणीही कोणावरही करतो प्रेमाचे अनेक प्रकार आहेत. आई-वडील-मुले, बहिण-भाऊ, प्रियकर-प्रेयसी, विद्यार्थी - शिक्षक अशा कोणत्याही प्रकारात असते. प्रेम हे श्रीमंत - गरीब, काळे - गोरे यात भेदभाव करत नाही. प्रेम फक्त एवढ्यापुरतेच मर्यादित नसते तर काही दिन - दुबळे, भूकंपपिडित, पूरग्रस्त असे वेगवेगळ्या व्यक्ती, स्थळ, निसर्ग अशा प्रकारात करताना दिसून येते. पति-पत्नीमधील शारीरिक प्रेम हे केंव्हा केंव्हा घातकसुद्धा ठरू शकते. प्रेम हे असावं पण काही अंतरावरच असणारं, सर्व गोष्टीत्र विचार करणारं. बोलून विचार करण्यापेक्षा विचार करून बोलाव. त्याप्रमाणे कोणतीही गोष्ट करताना परिस्थितीची पूर्ण जाणीव त्यांना असावी लागते. याप्रमाणेच 'ओहोळ' ही कथा दिसुन येते. या कथेमधील वसुधा आठ महिन्याची गरोदर आहे. त्यात उन्हाळयात पाऊस पडत होता. त्या वातावरणात ती अगदी प्रफुल्लित दिसत होती. खरं तरं पहिलं मुल म्हटल्यानंतर ते दोघानाही आवडत होत पण त्या वातावरणात ती सदाशिवला इतकी सुंदर दिसत होती की तो तिच्याकडे आकर्षिला जातो. वसुधा स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करते परिस्थितीची जाणीव करून देते पण त्याचा तो दिनवाणा चेहरा तिला पहावत नाही. कारण प्रेमाखातर त्यामुळे स्वत:चा विचार न करता ती बोलविते पण त्यांच्या एकत्र येण्याने शेवटी तिची भयानक अवस्था होते कारण पाण्याचा ओहळ समोरून वाहत होता तो रक्तीम होत जातो आणि त्यांचे स्वप्न लयाला जातं.

'कथा अख्या हिंमतरावाची' या कथेमधील हिंमतराव हे एक जिल्हा लेव्हलचा राजगार अधिकारी आहेत जबरदस्त व्यक्तिमत्व असल्यामुळे ऑफिसमध्ये त्यांचा मान आहे. ते विद्यावर प्रेम करतात पण शारीरिक भूक भागविण्यासाठी त्यांना बाई लागते. ही बाई संपतराव पुरवतात. वझेबाई ही त्यांच्या आयुष्यात आलेली बाई. त्यानंतर त्यांच्या ऑफिसमध्ये दर तीन महीन्याला नोकरीसाठी कार्ड भरणारी सुलभा कुलकर्णी. ही नोकरी मिळत नाही याचा जाब विचारण्यासाठी हिंमतरावांच्याजवळ जाते त्यावेळी हिंमतराव तिचे

डोळे, नितळ चेहरा, पुष्ट दंड यांच्या प्रेमात पडतात. पण तरी सुद्धा त्यांचे खरे प्रेम विद्यावरच आहे. इतर स्त्रीयांच्यापेक्षा विद्याचे घेतलेले चुंबन यामध्ये त्यांना वेगळाच भास होतो. कारण विद्यावरतीच त्यांचे प्रेम असल्यामुळे त्यामध्येच त्याना माधुर्य जाणवते. यामध्ये खरोखरच्या प्रेमाला महत्व दिले आहे.

पहिले प्रेम कधी आपला पाठलाग सोडत नाही मग त्या प्रेयसीहून स्वत:ला सुंदर पत्नी मिळो किंवा प्रियकराहुन सुंदर नवरा मिळो पहिले प्रेम हेच त्याना श्रेष्ठ वाटते. प्रथम पाहिलेली स्वप्न त्यांना लग्नानंतर आठवत राहतात. 'पाठलाग' या कथेत रघु हा राणीवर प्रेम करायचा ती एक विवाहीत आहे. तरीही त्या दोघांना एकमेकाना भेटावेसे वाटते रघुचे मंदाबरोबर लग्न होते. मंदा सुंदर असते. सर्वानाच ती आवडते. रघुलापण मंदा आवडते. रघु ठरवितो आपण असा संसार करायचा की राणीचीसुद्धा आपल्या संसाराला दृष्ट लागायला पाहिजे इतकी खुष मंदाला ठेवायचे पण राणीला विसरू पाहणारा रघु मंदाच्या प्रत्येक वेळी प्रथम त्याला राणी आठवते. कारण शेवटी प्रेम हे प्रेम असते ते एकमेकाला जुळवून ठेवते मंदाप्रमाणेच राणीचा नवरासुद्धा सुंदर आणि निष्पाप तरीसुद्धा एकमेकाना भेटतात. राणीला एवढेच वाटते की रघुने आपल्याकडे यावे - बोलावे. असे प्रेमाचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात. याचे चित्रण नागनाथ कोत्तापल्लेनी कथेद्वारे केले.

## २.९) वृत्तपत्रजगतातील अनितीमानता :

आज वृत्तपत्र घरोघरी दिसून येते. त्यांचे स्थान हे उच्च दर्जाचे आहे त्यामुळे अनेक वेगवेगळ्या बातम्या नजरेखालून जातात. कोठे काय घडते हे कळून येते पण सर्वच बातम्या काही सत्यस्थितीतील असतात असे नाही. घटनेतील सत्य वृत्तपत्रांनी मांडावे अशी अपेक्षा असते पण अनेकवेळा सत्य हे बाजुलाच राहते. आणि एखादी घटना भडकपणे मांडली जाते. जसा पैसा तशी बातमी खुमासदार असते. मनात नसतानासुद्धा बातमी फिरवून काही वेळा द्यावी लागते याचे चित्रण कोत्तापल्लेनी खालील कथेत केले आहे.

'विनोद' या कथेमध्ये पार्वतीबाईचा केलेला खुन पेपरमध्ये येऊ नये यासाठी शिवाजीरावांनी केलेले प्रयत्न दाखविले आहेत. मोहनराव हा एम.ए. झालेला सुशिक्षित

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पण नोकरी नसल्यामुळे पेपरमध्ये बातम्या द्यायचे काम करतो. पण यामुळे घरखर्च चालत नाही याचा फायदा मनोहरराव घेतात. माधवरावांना नोकरी लावण्याचे अमीष दाखवून मनोहरराव शिवाजीरावांच्याकडे घेऊन जातात. शिवाजीराव हे पैशाने जग जिंकता येते म्हणणारे शेवटी माधवरावाना कशा प्रकारे जिंकतात, या भ्रष्टाचारीत माधवरावसुद्धा फसतो .कारण तोही भ्रष्टाचारी म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. कारण मंडळाच्या कॉलेजमध्ये आपल्याला घेणार आहेत त्यामुळे तो पार्वती-बाईंचा खून शिवाजीरावांनी केला ही बातमी देत नाही. पंधराशेरूपये मिळाल्यानंतर स्वत: मत बदलणारे मोहनराव इतर किती मुलींचे नुकसान होईल याचा विचार करत नाहीत. कारण शेवटी तो मध्यमवर्गीय पडतो, कुठपर्यंत हे सत्य सर्वाना खरे वाटणार. शेवटी पैसे घेऊन खऱ्याचे खोटे करणारे असतातच ''टाकले पाच हजार डि.एस.पी पुढे म्हटलं काम करा. करतो काय? म्हटल आपल्या हातून नकळत घडलं. सालीचा गळा दाबावे लागेल असं वाटलचं नव्हत... ''असे शिवाजीराव सांगतात. पैसे देऊन काम करवून घेणारे आणि पैशासाठी असे काम करणारेसुद्धा खुपच आहेत.

## २.१०) सरकारी खात्यातील भ्रष्टाचारी :

जिथे तिथे भ्रष्टाचारीचा माज वाढत चालला आहे. सहकारी क्षेत्रातच नाही तर इतरत्र सगळीकडेच आणि ह्याच भ्रष्टाचारी संबंधी काही कथा कोत्तापल्लेनी लिहिल्या आहेत. पोलीस ज्यावेळी काही गुन्हेगार सापडत नाहीत तर त्याच व्यक्तीसारखी एखादी व्यक्ती पाहण्यात आली तर संशयीत अटक म्हणून केले जाते ,तर काही वेळेला पैसे मिळतात म्हणून एखाद्यावर गुन्हा नोंदायला मागे पुढे होत नाहीत. नावाप्रमाणेच हे लाच मिळाली की आरोपी निर्दोष सुटलाच अशीच एक भ्रष्टाचारी 'इत्यंभूत' मध्ये पहायला मिळते.

'इत्यंभूत' मध्ये इन्स्पेक्टर देशमुख यानी जर शिरसाळकरांना शोधले नाही तर सस्पेंड होणार होते. त्याच्यातच का नटराज फायनान्स कंपनीच्या कामासाठी आलेल्या पाटीलला शिरसाळकरच समजून आणतात. पाटीलने स्वत:ला शिरसाळकर समजावा यासाठी त्याचे भयंकर हाल करतात. शेवटी शिरसाळकर सापडला म्हणून इन्स्पेक्टर देशमुखाना फोन येतोय पण तो म्हणतोय, '' हॅलो,अजुन तो कबूल करीत नाही. ठीक

आहे. आज नाही उद्या कबूल करील. आपण तर मागेच जाहीर केले आहे ना ? आता कटकटी करू नकोस, येस, हाच शिरसाळकर आहे. आता खरा शिरसाळकर मिळाला तरी उपयोग नाही आपण तस जाहीर केलय की आम्ही पकडलाय शिरसाळकरांना ... राऊंड संपवून ये. तुला सांगतो मी सगळ इत्यंभूत बाबा.. आता वैताग नको हो.. हो.. त्याच काहीही कर. आपली बदनामी नको आता. मी इन्स्पेक्टर बोलतोय... तुला ऐकलं पाहिजे.'' [११]

असे हे इन्स्पेक्टर देशमुख खरा शिरसाळकर सापडला असुनसुद्धा पाटीलची चूक नसताना आपला त्रास वाचावा यासाठी खुनाचा आरोप त्याच्यावर घालून त्याचा बळी घेतात. पाटील हा निरापधार आहे. त्याच्यामागे त्याची पत्नी एक मुलगी आहे. संसारचं ओझं त्याच्यावर आहे. तरीसुद्धा फक्त स्वत:च्या स्वार्थापोटी आणि लोकांचा पोलीस खात्यावरील विश्वास उडेल यासाठी कशांप्रकारे खेळ करतात याचे दर्शन कोत्तापल्लेनी केले आहे. अशाप्रकारची भ्रष्टाचारी जास्त प्रमाणात आढळून येते अशात जर स्त्रियांना अटक केले तर त्यांचे हाल कुत्रेसुद्धा खाणार नाही यासारख्या बारीकसारीक गोष्टीकडे लेखकांनी अतिशय तीक्ष्णतेने पाहिले आहे.

कोर्टाची आणि दवाखाण्याची पायरी शहाण्याने कधीच चढू नये असे म्हटले जाते कारण कोर्ट कधीही आपलं काम वेळेवर करत नाही आणि दवाखाण्यात गेले तर एखादा रोग झाल्याचे समजल्याशिवाय राहत नाही. 'कोर्टाचा हँग ओव्हर' या कथेमध्ये लटकत पडलेली केस त्याच्यातून झालेली सुटका यासंदर्भाचे चित्रण येते. कोर्टामध्ये पहायला मिळते की अनेक केसेस या रेंगाळत असतात. अशीच एक पाटीलची केस दुकानासंदर्भात आलेली हे कोर्टाच्या दृष्टीत असते पण त्याच्याकडे दुर्लक्ष असते. पण जेंव्ह त्यांचा मित्र डॉ. शकील येऊन आपल्या भावाच्या मित्राची केस असल्याचे सांगतो त्याचबरोबर म्हणतो, '' बिल्कुल फिक्र करना नही जी हमने सब साक्षीदारको मनाया है। वो कहेंगे की हमारे सामने ये सील हुआ नही .. मामला खतम.. आप बिल्कुल फिक्र मत करो..''[११] याप्रकारे मित्रांच्या वसुल्यावरती किंवा पैसे मिळतील त्याच्या बाजूने न्याय देणे असे प्रकार घडतात. या कथेमधीलच कुलकर्णी हे वकील असून सुद्धा पैशासाठी तारखा वाढवणे, नक्कल पाहिजे अशी कामे करून देतो. अशामुळे निरपराध व्यक्ती त्यामध्ये

अडकू शकते याविषयी डॉ. शकील वकीलाचाच मुद्दा सांगतो, ''कोर्ट पुराव्याशिवाय काहीच करीत नाही ... हजार गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एका निरपराध माणसाला शासन होता कामा नये... ''[१६]

## २.११) मानवी नाते संबंधाचे चित्रण :

समाजामध्ये वेगवेगळी नाती आपल्याला निभवावी लागतात. पती-पत्नी, सासू - सून, आई-मुले, ननंद-भावजय, मित्र-मैत्रीण, मित्र-मित्र, प्रियकर - प्रेयसी, बॉस-सेक्रेटरी, गुरू - शिष्य अशा वेगवेगळ्या प्रकारात मोडत असतात. आणि ही नाते पाळणे आपले नकळत आपले कर्तव्यच वाटते. असेच स्वत:चे कर्तव्यच समजून मित्र - मित्र नाते निभवणारा बापू 'चक्र' या कथेत दिसून येतो. बापू हा द्विधावस्थत सापडलेला इकडे मित्राचा बाप मेला होता तर त्याच वेळी त्याच्या ताईची डिलेव्हरी होत होती. त्यामुळे तो रात्रीच्यावेळी पाऊस सुरू असताना मित्राबरोबर जाऊन मास्तरांना पाठवून देतो त्याचबरोबर मित्राच्या वडीलाचा मृत्यू झाल्याने रात्रभर तेथे बसतो. त्यात त्याचा भाऊ गावापासून लांब कोल्हापूरला राहत होता त्यामुळे त्याला कळवणे शक्य नव्हते. त्याचा मित्र म्हणजेच सुरेश याचे नातेवाईक गावात किंवा गावाच्या जवळपास नव्हते त्यामुळे सर्व जबाबदारी बापूवर पडते. बापू दुकानात असतो त्यामुळे गावातील लाकांची चांगली ओळख होती. सदाशिवरावना तो बोलवायला जातो पण येतो म्हणून सांगून येत नाही. बाया पहायला येत होत्या पण पुरूष कोणही येत नव्हते. शेवटी आजीच्या सांगण्यावरून बापू गावातील समाजसेवक पाटलोबातात्याला मित्राचे वडील मेल्याचे कळवतो. त्यात पाऊस त्यामुळे लोक यायला कचवचतात पण पाटलोबातात्यांच्या सांगण्यावरून चौघे येतात.

चार व्यक्ती येतात पण पावसातून घेऊन जाणे अवघड जाते. त्यात अग्नी कशी द्यायची त्यात रॉकेल मिळत नाही. बापुच्याकडे रॉकेल असते पण वडीलांच्या भितीमुळे सांगत नाही. पण जेंव्हा रॉकेल मिळतच नाही त्यावेळी त्याला अपराध्यासारखे वाटते. हिंदूमध्ये प्रेताला जाळले जाते पण ह्या प्रेताला मातीखालती पण घातले जात नाही. शेवटी गंगार्पन केले जाते अशा वेगवेगळ्या भयानक घटकांचे चित्रण कोत्तापल्लेनी केले आहे.

## २.१२) सामाजिक जीवनातील अंधश्रद्धा :

आपण आपले पुर्वज सांगतात ते गृहीत धरून तसेच वागत असतो. आई बाळाला सांगते, " त्या ठिकाणी जाऊ नको तेथे भूत असते" त्याप्रमाणे आपणही जेंव्हा त्याठिकाणी जातो त्यावेळी त्याची आठवण होते आणि आपण घाबरतो. असेच आपण एखाद्याच्या अंगात येत असेल किंवा एखादी देवी जागृत आहे असे सांगीतले तर आपण तसेच समजून वागतो. याचेच चित्रण नागनाथ कोत्तापल्लेनी 'कंकालेश्वर' या कथेत मांडले आहे. कथानायक हा कंकालेश्वरला जातो त्यावेळी तेथे एक स्त्री भेटते. त्याठिकाणची ऐतिहासिक स्थळे दाखवते. तेथील तलावचं पाणी उन्हाळ्यात वाढतं आणि पावसाळ्यात उतरतं अशी ती स्त्री सांगते पण प्रश्न पडतो की पावसाळ्यात पाणी वाढू शकले पण कमी कसे होईल. त्याच बरोबर ती सांगते की, " हे जे खांब आहेत ना त्याची संख्या कधीच समान भरत नाही. तुम्ही दोनदा मोजाल तर दोन आकडे येतील. दोन माणसांनी मोजल्यास पुन्हा दोन आकडे हे खांब समान कधीच भरनार नाहीत " [१३] पण कथानायक जेंव्हा ते खांब स्वत: कित्येकवेळा मोजता त्यावेळी चौऱ्याऐंशीच खांब होतात. पण लक्ष देऊन अशा गोष्टी आपण पाहत नसतो त्यावेळी अशा गोष्टीवर आपली नकळत श्रद्धा बसते.

'कोर्टाचा हँग ओव्हर' या कथेमध्येसुद्धा कोर्ट म्हणजेच वकील सुद्धा देवावर विश्वास ठेवणारा दिसून येतो. तर त्यांच्यातील अभ्यंकर वकील यांना अमावस्या - पोर्णिमेला प्रत्यक्ष भवानीमाताच अंगात येते असे समजून अनेक लोक त्यांच्याकडे जातात. लोक कितीही शिकले तरी शेवटी अशा गोष्टीवर लक्ष देतातच. या कथेतील कोर्टलासुद्धा वाटते की त्यांनी दिलेला अंगारा लावल्यामुळेच बाटली घ्यायची सुचली आणि आजार थांबला. त्याचबरोबर शेवटी त्यांना वाटते की आता आपण भवानीमातेला शरण जायला हवं तिच्या पायावर डोकं ठेवायला हवं.

अशाप्रकारच्या मुख्य अंधश्रद्धाच्या वर्मावर कोत्तापल्लेनी बोट ठेवलेलं आहे. त्याचप्रमाणे त्यांची 'काळोख हुंकार' ही कथा यामधील वामनबुवा शास्त्री ह्या कीर्तनकाराच्या कुटुंबाला काकुकडून शाप मिळाला आहे. शास्त्रीबुवांच्या आई ह्या आपल्या पेटीत सुया, लिंबु, बाहुल्या असं काहीतरी करायच्या, त्यामुळे त्यांच्या काकुंचा

पाचवेळा गर्भपात होतो असे त्यांच्या काका-काकुचा समज आहे. शास्त्रीबुवाचे वडील मरण्यामागे त्यांची आईच कारणीभूत होती असे एक मत आहे. त्यांच्या काकांना मुले नव्हती त्यामुळे वामनबुवांचे लाड ते खूप करायचे पण त्यांच्या काकुच्या पाचव्यांदा गर्भपात होतो त्यावेळी त्याचा तळतळाट शास्त्री बुवांच्या घराण्याला लागला आहे. शास्त्रीबुवाना पाच मुली आहेत. त्यांची पत्नी आजारी त्यामुळे स्वत: मरणार म्हणून त्याना मालन विषयी सुचविते .पण मालन मध्ये त्या गोष्टीत इतके गुंग होतात की त्यांची स्वत:ची मुलगी नलिनी हीचाच हात पकडतात त्या पत्नी मरते नलिनी वेढ्या सारखी करते व शेवटी शास्त्रीबुवा स्वताच्याच या मुलगीवर साप सोडून मारतात अशीच दुसरी मरते पुर्ण कुटुंबच उद्ध्वस्त होते. शास्त्रीबुवांच्या मागे काळ सर्प होता ज्याप्रमाणे काहीना मरणापूर्वी आपण मरणार हे समजते, त्या प्रमाणे शास्त्रीबुवाना काळ सर्प दिसायचा स्वत:च्या स्वार्थापोटी लोक काहीही करू शकतात त्या प्रमाणे त्यानी मुलीना मारले. पत्नी आजारी होती त्या वेळी दुसरी बाई त्यानी ठेवली होती. त्यांच्या घरातील साप मोठा होतच होता तोच साप शेवटी त्यांच्या समोर येतो. त्यावेळी त्याना काकुच समोर असल्याचा भास होतो त्यात त्याचा शेवट होतो. पण मुख्य म्हणजे संसार उद्ध्वस्त व्हायचे कारण शास्त्रीबुवाच होते. कारण ते घरातील लोकांना समजून घेत होते का? स्वत:च्या मुली मोठ्या असून सुद्धा त्यांच्या लग्नाचा विचार करत नव्हते. पन्नाशी कडे झुकले असून आपल्या मुलीपेक्षा मोठ्या असणाऱ्या मुलीवर त्यांचे लक्ष, पत्नी आजारी असून इतर बायाशी संबंध हेच दोष कारणीभूत आहेत पण काकुचा शाप यावर थोपवला आहे. ही शेवटी एक अंधश्रद्धाच आहे.

## २.१३) मानवी जीवनातील एकाकीपणा :

काही व्यक्ती अशा असतात की स्वत:चे विचार दुसऱ्यासमोर प्रकट करू इच्छितात पण तेवढेधाडस नसल्याने किंवा समाजाचा विचार करून मागे वळतात. 'काळोखात उतरून' या मथेतील नायक हा स्वत: कोठे आहे? आपलं अस्तित्व काय हे शोधू पाहत आहे. जग कोठे चाललयं हे त्याला जाणवत असलं तरी आपले विचार हे

कोणासमोर प्रकट करू शकत नाही. स्वत:चे विचार व्यक्त करावे. स्वत:ला हवं तसं वागांव यासाठी त्याची हिंमतच नाही. थुंकी थुंकायची होती पण तिही आतल्या आत जाते. म्हणजे लहानसहान गोष्टीसुद्धा करायला होत नाहीत हे एक अंतर्गत द्वंद्व आहे.

न्यायदेवता आंधळी आहे ती डोळयाला पट्टी लावून न्याय देते आणि लोक मात्र डोक्याचे केस पांढरे झाले तरी योग्य अयोग्य काय याकडे दुर्लक्ष करून जयजयकार करतात. हे सर्व तो निसर्गासमोरच बोलून काय होत? अशी एखादी व्यक्ती सुधारणा घडवू पहात असेल तर त्याकडे लोकांचे दुर्लक्ष पण जेंव्हा ती व्यक्ती मरण पावते त्यावेळी त्याची जयंती त्यावर भाषणे ठोकली जातात. जेथे माणसे आणि कुत्री भुंकतात तेथेच गल्ली असल्याचे जाणवतं. जेथे एखादी व्यक्ती गात सुटते तोच तेथील नायक असतो. दारू जेथे मिळते तेथेच तो रमतो आणि कोपऱ्यात येऊन पडतो असेच सामान्य व्यक्तीचे जीवन. सूर्यसुद्धा आपले दररोजचे काम करतो. सकाळी उगवतो आणि संध्याकाळी मावळतो त्याप्रमाणे आपणही शांत रहा, दररोजचे काम व्यवस्थीत करा आणि आपली जागा व्यवस्थित राखून ठेवा. त्यांचे विचार याना अजून ही वाव नाही. तो आपले विचार दुसऱ्यासमोर मांडू शकत नाही किंवा तो तसा वागू शकत नाही त्यामुळे तो म्हणतो, ''अधांतरी युधिष्ठर मी'' [१४]

''वणवा'' या कथेमध्ये या कथानायकाला आई-वडील किंवा इतर नात्यातील रक्ताचे असे कोणीच नाही. हा एकटाच त्यात चाळीशी उलटली तरी लग्न नाही त्यामुळे स्वत:मध्ये गर्क असणारा अजिंठा - वेरूळच्या लेण्यापाशी वीस - बावीस वर्षापासून आहे. हर्सुलचा तलाव म्हणजेच त्याचा मित्र एक पोरगच एवढे त्याच्याजवळ भाकरी खायला येते त्यांने एक बाई गाठले तिच्याविषयी गमती त्याला तो सांगतो. हा कथानायक शारीरिक भुकेला आहे. तेथे अनेक शिल्पकला कोरलेल्या आहेत त्यातील एक नर्तकी त्याला मासल देहाचिच वाटते. तो तिच्याशी इतका एकरूप होतो की आपली शारीरिक भूक भागवू पाहतो. पण तेथे आलेली पंजाबी स्त्री तिची आठवण त्याला होते. ती जेंव्हा एका मुर्तीबद्दल विचारत होत्या त्यावेळी तो ती मुर्ती चोरीला गेल्याचे सांगतो त्यावेळी त्या दु:खाने त्याचा आधार घेते. त्यावेळेचा तो स्त्री स्पर्श त्याने अनुभवला होता पण ती जेंव्हा भानावर येते त्यावेळी त्याला झिडकारते , असाच भास त्या नर्तिकाजवळ होतो.

तो म्हणतो, '' बाईनच जवळ बोलावलं आणि झिडकारलं - काय म्हणून?... आता ह्या नर्तिकेनंही असच झिडकारल का ? '' [१५] त्याचबरोबर तेथील सर्व नर्तिका मोठमोठ्यानं हसताहेत. त्याच्या वर्तनावर हा मात्र त्यांच्या हास्यकल्होळात जळतो आहे पण जेंव्हा तो त्यातून जागृत होतो तेंव्हा पाऊस पडायचा केंव्हाच थांबला होता.

'पाणी' या कथेमध्ये थकलेला, पाण्यासाठी वाळवंटात भटकणारा हा कथानायक. वाळवंटात एकाच ठिकाणी ओयॅसिस असतं, तेथेच हिरवगार गवत आणि स्वच्छ पाणी मिळतं त्यामुळे तेथे त्याला त्याचे भूगोलचे मास्तर आठवतात. ते सांगायचे, '' दु:खी जीवनात जसा प्रेमाचा आधार असतो तसे वाळवंटात हे ओयॅसिस ... '' [१६] हा कथा नायक खूप फिरतो पण पाणी मिळत नाही दुरवरून उंटाचा काफिला दृष्टीस पडतो .त्याच्यावरून दिडशे सांडणीस्वार येत होते पण त्यामध्ये एकही स्त्री नव्हती. हे लोक देत स्त्रीयाशिवाय कसे राहतात हेच कथानायकाला सुचत नाही. मुख्य म्हणजे पाणी हे लोक देत नव्हते त्यासाठी आपल्या लुटारूंच्या टोळीत त्याला सामील व्हायला सांगत होते. शेवटी एक रात्रीच्या जगण्यापूरते पाणी द्या म्हटल्यानंतर बादशाहे अलमगीर एक जखड म्हाताऱ्या उंटाला ओढून घेतो आणि त्याच्या पोटातील पाण्याची पिशवी काढून पिण्यास सांगून जातो.

या जगात कुठंही कितीही फिरा प्रेमाने जवळ करणारे लोक काहीच भेटतात. सर्वजन स्वत:च्या स्वर्थापोटी जगत असतात. स्वत:च्या स्वार्थापोटी दुसऱ्याचे जीवन सुद्धा उद्ध्वस्त करू शकतो जस पाण्यासाठी उंट कापून त्याच्या पोटातील पिशवी काढून प्यायसाठी वापरणे. त्यावेळी उंटाचा विचार आपण करत नाही अशाप्रकारे अनेक गोष्टींचा विचार डोळसपणे करून नागनाथ कोत्तापल्लेनी आपल्या कथा मांडल्या आहेत.

## सारांश:

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'काफिला' व 'संदर्भ' या कथासंग्रहातील कथांचे आशयसूत्र पाहीले. त्यांच्या कथेतील पात्रे त्या त्या विशिष्ट समाजाशी निगडीत असलेली दिसून येतात. मानवी मनाचे खरेखुरे चित्रण त्यांच्या कथांतून दिसून येते. समाजात घडणाऱ्या अनेक घटना म्हणजेच स्त्री - पुरूष यांच्यातील प्रेम तसेच अनेक ताणतणाव

यांचे तीक्ष्ण दृष्टीने चित्रण केले आहे. समाजाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोण डोळस आहे. लहान मुलापासुन वृद्धापर्यंतचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यांच्या प्रत्येक कथा ह्या वेगवेगळ्या मोडीतून गेलेल्या आहेत.एक वितीच्या पोटासाठी विदूषकासारख्या व्यक्तीला त्यांच्यापुढे नमावं लागत. सतत हसणाऱ्या व्यक्तीला दु:खाचा प्रत्यय येणारी गोष्ट नाही सांगीतले तर राजा त्याला ठार मारणार. सामान्य व्यक्तीला साधा अधिकार नाही स्वतंत्रपणे जगण्याचा . पतीच्या मर्जीनूसार पत्नीते वागायला हवं. लाचारी पत्करावी पण पोटासाठी काहीतरी मिळवावं यासाठी धडपडणारी मोहनसारख्या व्यक्तीची आई तर पोटासाठी आजारी असूनसुद्धा फुकटचे हसुन स्वागत करणारी वेश्या यांचे चित्रण त्यानी केले आहे.

भ्रष्टाचारी समाजजीवनाचे चित्रण त्यानी 'कोर्टाचा हँग ओव्हर', 'विनोद', 'इत्यंभूत' सारख्या कथांतून मांडला आहे. वृत्तपत्रातून आपली वाईट बातमी येऊ नये यासाठी शिवाजीरावासारखी धडपडणारी माणसे. तसेच स्वत: सस्पेंड होऊ नये यासाठी स्वत:च्या स्वार्थापोटी एखाद्या गरीब व्यक्तीला तिच समजून झोडपणारे पोलीस तर अंतरजातीय आहे म्हणून आणि पावसातून प्रेत घेऊन जावं लागणार म्हणून सुरेशच्या वडिलांच पडलेलं प्रेत आणि त्यासाठी धडपडणारा त्याचा मित्र यासारख्या सुद्धा व्यक्ती समाजात दिसून येतात.

कितीही समाज सुधारला तरी अंधश्रद्धेत बरबटलेला आहेच त्याचा प्रत्यय वकीलाच्या स्वरूपात दिसून येतो तसेच स्वत:च्या स्वार्थापोटी मुलीचाही विचार न करणारा बाप 'काळोख हुंकार' कथेमध्ये दिसून येतो. त्याचबरोबर स्वप्नाच्या दुनियेत जगणारी माणसे काही स्वप्ने पाहतात, समाजाची काही पाहतात, स्वत:च्या संदर्भात तर काही पाहतात. होऊन गेलेल्या मुतकालीन गोष्टीविषयी याचेही चित्रण केले आहे. त्यांच्या काही कथा ह्या समाजात घडणाऱ्या गोष्टीविषयी आहेत. मुलाला जन्म देणाऱ्याविषयीचा व त्यावेळेचे पत्नी - पत्नीमधील प्रेम तसेच मुलगा शिकून मोठा होऊन कमवत नसला तर त्यावेळी ऐकावे लागणारे टोमणे याचे चित्रण येते.

समाजात असे काही लोक असतात की ते मानवापेक्षा प्राण्यावर प्रेम करणारे याचे चित्रण 'मया' या कथेत येते तर काही व्यक्ती या इतक्या अल्लड असतात की एकच

गोष्ट गृहीत धरून त्यासंदर्भात विचार करणाऱ्या मग त्याच्यात इतरांचा विचार न करणाऱ्या. 'राखण' या कथेत अशाच एका अल्लड व्यक्ती मुळे शेवटी त्याला सोडून पळून जाणारी स्त्री त्यामध्ये दिसून येतो. तर त्यांच्या काही कथांमधून एकाकीपणा दिसून येतो. स्वत:च स्वत:च्या कार्यात गुंग असणाऱ्या तसेच काही व्यक्तींना खूप काही समाजासाठी करावेसे वाटते पण तेवढी जिद्द नसलेले स्वत: भोवतीच पिंगा घालणाऱ्या काही व्यक्ती दिसून येतात. काही व्यक्ती स्वत:चा आत्मविश्वास पाहण्यासाठी दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणारी तर काही व्यक्ती की ज्याना जीवन नकोसे वाटते त्यामुळे आत्महत्या करू पाहणाऱ्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्ती त्यांनी चित्रित केल्या आहेत.

ग्रामीण मराठी साहित्याची निर्मिती करताना अनेक लेखकामध्ये एक महत्वाचे लेखक म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले वाटतात. कारण बदलत्या ग्रामीण जीवनाचे अर्थपूर्ण रूप त्यांच्या साहित्यातून दिसून येते. लहान सहान गोष्टीकडे दूरदृष्टीने पाहणे त्याचबरोबर निसर्ग, भाषा, वातावरण, पारंपारिक रूढी, समजुती, रीति - रिवाज, श्रध्दा याचबरोबर माणूस शोधण्याचा प्रयत्न त्यांच्या कथांच्याद्वारे दिसून येतो.

## संदर्भ टिपा


१) कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.५५

२) तत्रैव : पृष्ठ क्र. ५७

३) कोत्तापल्ले, नागनाथ. : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र.६१

४) तत्रैव : पृष्ठ क्र. ८२

५) तत्रैव : पृष्ठ क्र. ५

६) तत्रैव : पृष्ठ क्र. ५

७) तत्रैव : पृष्ठ क्र. १७

८) कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.१२

९) कोत्तापल्ले, नागनाथ. : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र.४३

१०) तत्रैव : पृष्ठ क्र. ४५

११) तत्रैव : पृष्ठ क्र. ४९

१२) तत्रैव : पृष्ठ क्र. ५३

१३) कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.६२

१४) कोत्तापल्ले, नागनाथ. : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र.९५

१५) कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.३९

१६) तत्रैव : पृष्ठ क्र. १४